राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान (एनएमअेइटी) अंतर्गत बियाणे व लागवड साहित्य उप अभियान (एसएमएसपी) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम सन २०१८-१९ मध्ये राबविण्याकरीता <u>निधी वितरीत करणेबाबत.</u>

## महाराष्ट्र शासन

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: पुरक १५१८/प्र.क्र.२२५/१अे**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १५ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> :- १) केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या सांकेतिक स्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्राज्ञान अभियान (एनएमअेइटी) अंतर्गत बियाणे व लागवड साहित्य उप अभियान (एसएमएसपी) बाबतच्या मार्गदर्शक सूचना.

२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक No.12-01/2015, S.D.-I, दिनांक ०९.११.२०१५.

३) केंद्र शासनाचे निधी वाटपाबाबतचे पत्र क्र.१०-२/२०१८-SD.VI, दि.०६ जुन, २०१८.

४) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक योजना ३३१८/प्र.क्र.१३५/१अे, दिनांक ३१ जुलै, २०१८.

५) केंद्र शासनाचे निधी वाटपाबाबतचे पत्र क्र.१०-२/२०१८-SD.VI, दि.२० नोव्हेंबर, २०१८.

६) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक पुरक १५१८/ प्र.क्र.१८/ १अे, दिनांक १८ सप्टेंबर, २०१८.

<u>**प्रस्तावना :-**</u>

केंद्रीय योजना आयोगाने नियुक्त केलेल्या बी.के.चतुर्वेदी समितीच्या शिफारशी केंद्र शासनाने स्विकारलेल्या आहेत. त्यास अनुसरून सर्व केंद्र पुरस्कृत योजनांची पुनर्रचना ६६ केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये करण्यात आलेली आहे. सन २०१४-१५ पासून सदर पुनर्रचित योजनांमधील काही योजना एकत्रित करून अभियानाच्या स्वरूपात राबविण्याचे केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान (एनएमअेइटी) या केंद्र पुरस्कृत अभियानांतर्गत बियाणे लागवड व साहित्य उप-अभियान (एसएमएसपी) राबविण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ०६ जून, २०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने अनुसुचित जाती घटकाकरीता केंद्र पुरस्कृत "ग्राम बीजोत्पादन कार्यक्रमाकरीता" (केंद्र हिस्सा ६० टक्के) रूपये ४०८.३९ लाख आणि ग्राम बीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत "प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रमासाठी" (केंद्र हिस्सा ६० टक्के) रूपये ४१.६० लाख, अशा प्रमाणात केंद्र हिस्सा एकूण रू. ४४९.९९ लाख इतका निधी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला यांना थेट उपलब्ध करून दिलेला आहे, त्याप्रमाणात अनुसुचित जाती संवर्गासाठी राज्य हिस्सा (४० टक्के) रुपये २९९.९९ लाख इतका होत आहे.

संदर्भ क्रमांक ५ येथील दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत "ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम" रब्बी हंगाम २०१८-१९ मध्ये राबविण्याकरीता (केंद्र हिस्सा ६० टक्के) अनुसुचित जाती शेतकऱ्यांकरीता रूपये ९८७.३५ लाख इतका निधी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला यांना थेट उपलब्ध करून दिलेले आहेत, त्याप्रमाणात राज्य हिस्सा (४० टक्के) रूपये ६५८.२३ लाख इतका होत आहे.

राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत बियाणे व लागवड साहित्य उप अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेतील "ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम" व "प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रम" राबविण्यासाठी संदर्भ क्रमांक ६ च्या कृषि व पदुम विभागाच्या दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्य हिस्सा रूपये ७७.०० लाख इतका निधी वितरीत करण्यात आलेला होता.

यासंदर्भात राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत बियाणे व लागवड साहित्य उप अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेतील "ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम " व "प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रम" सन २०१८-१९ मध्ये (केंद्र व राज्य हिस्सा ६०: ४०) करीता अनुसुचित जाती घटकासाठी राज्य हिस्सा रूपये ११०५.२९ लाख इतकी तरतुद वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत बियाणे व लागवड साहित्य उप अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेतील "ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम" व "प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रम" यासाठी सन २०१८-१९ च्या हंगामामध्ये ( केंद्र व राज्य हिस्सा ६०: ४० प्रमाणे ) अनुसुचित जाती घटकासाठी (लेखाशीर्ष २४०१ ए ३३२) राज्य हिश्याकरीता रूपये ११०५.२९ लाख इतकी तरतुद महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला यांना वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी. सदर निधी अनुसुचित जाती संवर्गातील लाभार्थ्यांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

३. वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८, दिनांक २७.०७.२०१८ व दिनांक ०५.१२.२०१८ रोजीच्या परिपत्रकातील अटींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २८/२०१९/व्यय-१, दिनांक ०६/०३/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१५१४४०५३१७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Umesh Narayan Chandiwade

Digitally signed by Umesh Narayan Chandiwade
DN: CN = Umesh Narayan Chandiwade, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and ADF Department
Date: 2019.03.15 14:47:55 +05'30'

**( उमेश चांदिवडे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, महाबीज भवन, कृषिनगर, अकोला.
६. संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला.
११.उप सचिव (२-अे)/(निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.अवर सचिव, कार्यासन -६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
१६.निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.